# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MUHS

MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel : (0253) 2539194/199, Fax : (0253) 2539200

Website : www.muhs.ac.in, E-mail : pgacademic@muhs.ac.in

**डॉ. कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**कुलसचिव**

Dr. Kalidas D. Chavan
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
Registrar


जा.क्र. मआविवि/ईओ-२/१०७३/२०१८ / ...        दि. २५/०७/२०१८

## परीपत्रक क्र. ०३ /२०१८

प्रति,

**अधिष्ठाता/प्राचार्य,**
सर्व सलंग्नित पदवी व पदव्युत्तर
महाविद्यालये/ परिसंस्था,
मआविवि, नाशिक

विषय : आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असंतांना महाविद्यालयात परीधान करावयाच्या पोशाख / पेहराव (Dress Code) बाबत....

संदर्भ : विद्यापरिषद बैठक दिनांक १८/०६/२०१८ ठराव क्र. ४२/२०१८.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन विद्यापीठाशी संलंग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालय / रुग्णालय परिसरात वावरतांना तसेच परिक्षा केंद्रावर विद्यापीठाच्या परिक्षांकरीता उपस्थित असतांना पोशाख / पेहराव (Dress Code) ठरविणेबाबतचा विषय विद्यापीठाच्या विद्यापरिषदेच्या दिनांक १८/०६/२०१८ रोजीच्या बैठकीत विषय क्र. ४२/२०१८ अन्वये सादर केला असता खालीलप्रमाणे नियमावली निश्चित करण्यात आलेली आहे.:-

**"अ) महाविद्यालयीन परिसर/रुग्णालयीन परिसर/ग्रंथालय परिसरामध्ये वावर करतांनाच्या पेहरावाबाबत...**

**विद्यार्थी :-**

- शर्ट व फुल पॅन्ट असावी
- ॲप्रन असावे
- पायात शुज असावे
- छोटया लांबीची पॅट (Short Pant) व बरमुडा नसावी.

**विद्यार्थीनी :-**

- शर्ट व फुल पॅन्ट/साडी/सलवार कमीज असावे
- ॲप्रन असावे
- पायात शुज असावे
- बिनबाहीचे शर्ट, बरमुडा/छोटया लांबीची पॅट (Short Pant) किंवा स्कर्ट नसावे.

ब) <u>परीक्षा कालावधी करीता परीक्षा केंद्रावरील पेहरावाबाबत :-</u>

विद्यार्थी :-

- अर्ध्या बाहीचे शर्ट (Half Sleev Shirt)/ टी-शर्ट (T-Shirt) व फिक्या रंगाचा शर्ट आणि फूल पॅंट असावे
- शर्टाला छोटे बटण असावे, नक्षीदार बटण नसावे, अंगठी, गळयातील साखळी यांसह अन्य कुठल्याही प्रकारचे दागिने घालून परीक्षा देता येणार नाही.
- घडयाळ, मोबाईल किंवा कुठलेही ईलेक्ट्रॉनिक उपकरण नसावे.
- ॲप्रन नसावे, टोपी, गॉगल, मनी पर्स, वॉलेट वापरता येणार नाही.
- पायात चप्पल/स्लिपर असावी, पायात शूज नसावे.

विद्यार्थीनी :-

- अर्ध्या बाहीचे शर्ट (Half Sleev Shirt)/ टी-शर्ट (T-Shirt) व फिक्या रंगाचा शर्ट आणि फूल पॅंट किंवा साडी किंवा सलवार कमीज असावे
- शर्टाला छोटे बटण असावे, नक्षीदार बटण नसावे, अंगठी, गळयातील साखळी (मंगळसुत्र वगळता) यांसह अन्य कुठल्याही प्रकारचे दागिने घालून परीक्षा देता येणार नाही.
- घडयाळ, मोबाईल किंवा कुठलेही ईलेक्ट्रॉनिक उपकरण नसावे.
- ॲप्रन नसावे, बांगडया, अंगठी, पीन, चेन, हार, हॅंड बॅग किंवा पर्स / मनी पर्स आदी वस्तू वापरता येणार नाही.
- पायात चप्पल/स्लिपर असावी, पायात शूज नसावे.

क) सदर पोशाखाबाबत रंगसंगती महाविद्यालयीन स्तरावर (स्थानिक व्यवस्थापन समितीस) ठरविण्याचे अधिकार देण्यात यावे. तसेच धार्मिक परंपरेशी संबंधित/अल्पसंख्यांक (Minority) दर्जा असलेल्या महाविद्यालयांनी त्यांच्या धर्माबाबत उपरोक्त महाविद्यालयीन परिसर/रुग्णालयीन परिसर/ग्रंथालयीन परिसर येथे वावर करतांनाच्या पेहरावाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित महाविद्यालयास देण्यात यावे. सदर महाविद्यालयांनी घेतलेला निर्णय विद्यापीठास कळविणे बंधनकारक असावे. तथापि सदर महाविद्यालयांनी परीक्षा कालावधीकरीता परीक्षा केंद्रावरील पेहरावाबाबत उक्त उल्लेखीत "ब" प्रमाणे नियम पाळणे बंधनकारक असेल."

उक्त नियमावलीची नोंद घेण्यात यावी व त्याअनुषगांने योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन अहवाल विद्यापीठास सादर करावा.

कळावे.

कुलसचिव

प्रत माहितीस्तव :- १ मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक

२ मा. प्रती-कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक

३ कुलसचिव, कार्यालय,मआविवि, नाशिक